**Office of Controller Legal Metrology, Maharashtra State,**
7th Floor, Fountain Telecom Building No.1
Hutatma Smarak Chawk, M.G.Road, Mumbai-400 001.
Tel : 022-22621968/22621972/22621978
e-mail : clmms@yahoo.in;dclmms@yahoo.in ;dclmms_complaints@yahoo.com

Date: 31st May, 2022

**Procedure for online application for verification of weight or measure.**

In compliance with the mandate of Business Reform Action Plan (BRAP) 2022 reforms framed by Department for Promotion of Industry and Internal Trade (DPIIT) Government of India in respect to allow users of weight or measure to apply online forverification of weight or measure. The procedurefor online application isas follows-

1) Visit "vaidhmapan.maharashtra.gov.in" to view user manual for online application for verification of weight or measure.

2) After login on "**MAITRI**" portal with valid credential select the "Legal Metrology Department" and select "apply for verification of weight or measure" tab and submit the application as per instruction given in user manual.

3) After receipt of the application for verification/re-verification of weight or measure-
   a) Concern Inspector/Assistant Controller will scrutinize the application and if, he found application is complete in itself- inform the date for verification by notification with instructions required if any;
   b) If, the application is, not complete in itself, reject the application or inform the discrepancies regarding documents, details of weight or measure, fees for verification and stamping observed in applications. After compliance of thequeries, he will inform the date for verification by notification with instructions required if any.
   c) If, application received is not from his jurisdiction, reject the application or refer the application to concerned Legal Metrology, if he knows the same.

4) Application will be rejected with reason if,
   a) Application received is not from his jurisdiction.
   b) Fee is not deposited in respective ILM division through GRAS.
   c) Fee deposited is less than required as per details of weight or measure submitted and also intimated by Legal Metrology Officer as per provisions if any.
   d) Application is not complete in itself or applicant not complied queries raised by concerned area Inspector/Assistant Controller.
   e) Weight or measure not produced for verification on date given for the same.

5) Applicant should apply 30 days in advance for verification work to be done at users/ trader premises. Legal Metrology Officer will not responsible for additional fees payable if any due tonot applied in specified time.

6) Applicant can track the status of the application through their login.

(Dr. Ravinder Kumar Singal)
Controller of Legal Metrology,
Maharashtra State, Mumbai

नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
७ वा मजला, महानगर टेलीफोन निगम बिल्डींग क्र. १,हुतात्मा स्मारक चौक, एम.जी. रोड मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी : ०२२-२२६२१९७८/२२६२१९६८ ई-मेल: dclmms@yahoo.in

दि.३१ मे, २०२२

## वजन वा माप यांचे पडताळणीकरीता ऑनलाईन अर्जासाठी कार्यपद्धती.

डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्रीज ॲड इंटरनल ट्रेड भारत सरकार यांनी उद्योग सुधारणा कृती योजना २०२२ (बी.आर.ए.पी.) अंतर्गत निर्धारीत केलेल्या सुधारणा क्रमांक २४० च्या पुर्ततेसाठी वजन वा माप यांचे पडताळणीकरीता ऑनलाईन अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपद्धती खालीलप्रमाणे असेल-

१) वजन वा माप यांचे पडताळणीकरीता ऑनलाईन अर्ज करण्याठीची नियमावली, कागदपत्रे/ तपासणी सुची पाहण्यासाठी यंत्रणेच्या "vaidhmapan.maharashtra.gov.in" यासंकेतस्थळाला भेट द्या.

२) योग्य त्या क्रेडेन्शियलद्वारे **"मैत्री"** या पोर्टलवर लॉग इन केल्यानंतर वजन वा माप यांच्या पडताळणीसाठी कार्यनियमावली मध्ये देण्यात आलेल्या सुचनेनुसार अर्ज सादर करा.

३) वजन वा माप यांच्या पडताळणी/ फेरपडताळी करीता अर्ज प्राप्त झालेनंतर-

क) संबधित निरीक्षक/ सहायक नियंत्रक अर्जाची छाननी करेल आणि अर्ज परीपूर्ण असल्याचे आढळून आल्यास, त्याबाबतची नोंद टिपणीमध्ये घेऊन पडताळणीची तारीख व काही सुचना असल्यास, सुचनेद्वारे अर्जदारास कळवेल.

ख) जर अर्ज परीपूर्ण नसेल, तर अर्ज रद्द करेल किंवा कागदपत्रे, वजन वा माप यांचा तपशिल, पडताळणी व मुद्रांकन शुल्क याबाबत असलेल्या त्रुटींच्या पुर्ततेसाठी अर्जदारास कळवेल. त्रुटींच्या पुर्ततेनंतर पडताळणीची तारीख व काही सुचना असल्यास सुचनेद्वारे कळवेल.

ग) प्राप्त झालेला अर्ज त्यांच्या कार्यक्षेत्रातील नसेल, तर असे अर्ज रद्द करेल किंवा असे अर्ज कोणत्या निरीक्षक/सहायक नियंत्रक कार्यक्षेत्राशी निगडीत आहे याबांबत माहीती असल्यास संबधित निरीक्षक/सहायक नियंत्रक यांचेकडे वर्ग करेल.

४) कारणांसह अर्ज रद्द करता येतील जर-

क) प्राप्त अर्ज त्यांचे कार्यक्षेत्रातील नसेल,

ख) पडताळणी व मुद्रांकन शुल्क त्यांचे ग्रास विभागात जमा केलेले नसेल,

ग) जमा केलेले शुल्क हे नियमातील तरतुदीपेक्षा किंवा निरीक्षक यानी कळविलेल्यापेक्षा कमी असेल,

घ) अर्ज परिपूर्ण नसेल किंवा निरीक्षक/सहायक नियंत्रकयांनी कळविलेल्या त्रुटींची पुर्तता केली नसेल,

ङ) देण्यात आलेल्या तारखेस वजन वा माप पडताळणीसाठी सादर न केल्यास.

५) फेर-पडताळणीचे काम उपयोगकर्त्याच्या जागेवर करावयाचे असल्यास अर्जदाराने ३० दिवस आगाऊ अर्ज करावा. अर्ज विहीत कालावधीत केला नसल्यामुळे अतिरीक्त शुल्क भरावे लागल्यास त्यासाठी वैध मापन शास्त्र अधिकारी जबाबदार असणार नाहीत.

६) अर्जदारास त्यांच्या लॉग इन द्वारे अर्जाची स्थिती पाहतां येईल.

(डॉ. रविंद्र कुमार सिंगल)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.